ePaper

## उद्धव ठाकरेंना आणखी एक धक्का, बडा नेता एकनाथ शिंदेंच्या गळाला

| वर्ष - 8 | अंक - 287 | UDYAM-MH-26-0158827 |





महाईन्यूज ™

### आतील पानांत


- अखेर लखनऊला सूर गवसला!
- बेन डकेटची स्फोटक खेळी!
- ...तर परिणाम भोगावे लागतील!
- प्रश्न विचारताच ट्रम्प संतापले


www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 23 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## राजकीय भूकंपांनी महाराष्ट्र हादरणार

# मोदींच्या मंत्रिमंडळामध्ये सुप्रिया सुळे यांची वर्णी ?

## ‘राष्ट्रवादी’ चे दोन्ही गट एकत्र येण्याची शक्यता, मोदी - शाहांचा ‘हिरवा कंदील’!

| नवी दिल्ली/ मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**महाराष्ट्राच्या राजकारणात येत्या पंधरा-वीस दिवसात मोठा राजकीय भूकंप होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येण्याचे संकेत मिळत असून त्या बदल्यात शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांची वर्णी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात होण्याची शक्यताही वर्तविण्यात येत आहे, चर्चा अंतिम टप्प्यात आहे.**




### नव्या राजकारणाची नांदी..

शरद पवार आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे गट लवकरच एकत्र येऊन त्यांचे विलीनीकरण होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात बोलली जात आहे त्यामुळे राजकीय भूकंपाने महाराष्ट्र अक्षरशः हादरणार आहे. दोन्ही गटांना एकत्र येण्यासाठी नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनी हिरवा कंदीलही दाखवल्याचे बोलले जाते.

### ‘वक्फ’ सारखी विधेयके महत्त्वाची...

पाकिस्तानची खुमखुमी जिरवल्यानंतर नरेंद्र मोदी आता देशाच्या अंतर्गत प्रश्नांकडे लक्ष घालणार आहेत. त्यावर लवकरात लवकर तोडगे काढण्यासाठी त्यांची जुळवाजुळव सुरू आहे. यामध्ये प्रामुख्याने वक्फ दुरुस्ती विधेयक, समान नागरी कायदा, परदेशी नागरी कायदा हे कायदे लवकरात लवकर मंजूर करून घ्यायचे आहेत, यासाठी त्यांना अपेक्षित बहुमताची आवश्यकता असून त्यासाठी हा निर्णय घेण्यात येत असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

### सुप्रिया सुळे यांच्यावर जबाबदारी...

या नवीन राजकीय घडामोडींचा संदर्भ नरेंद्र मोदी यांनी आखलेल्या गेल्या आठवड्यातील शिष्टमंडळापर्यंत पोहोचतो. ‘ऑपरेशन सिंदूर’ हे कसे महत्त्वाचे होते, दहशतवाद्यांचा भारताने कसा फडशा पडला आणि पाकिस्तानच्या कुरापती तसेच कटकारस्थाने इतर देशांना पटवून देण्यासाठी जी शिष्टमंडळे तयार करण्यात आली, त्यातील एका शिष्टमंडळाचे नेतृत्व नरेंद्र मोदी यांनी विश्वासाने सुप्रिया सुळे यांच्याकडे दिले, तेव्हाच खऱ्या राजकारणाला आणि जुळवाजुळव करण्याला सुरुवात झाली.

### संजय शिरसाट यांचा दुजोरा

शिवसेनेचे प्रवक्ते आणि फडणवीस मंत्रिमंडळातील एक मंत्री संजय शिरसाट यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे. महिन्याभरात शरद पवार दुसऱ्या पक्षात जातील आणि सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री होतील, असे संजय शिरसाट यांनी मोठे वक्तव्य केले आहे. सुप्रिया सुळेंची केंद्रात मंत्री होण्याची पूर्वीपासून इच्छा आहे. त्या मंत्री होऊ शकतात, हे नाकारता येत नाही, असे शिरसाट म्हणाले.

### शरद पवार यांचेही संकेत..

राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठा राजकीय भूंकप होणार असल्याचे संकेत काही दिवसांपूर्वी ज्येष्ठ नेते खासदार शरद पवारांनी दिले होते. आमच्या पक्षातील एका गटाला अजित पवारांसोबत जावे वाटते, असे विधान पवारांनी केले होते. तथापि, राजकारणात काहीही अशक्य नाही. मला वाटते, भविष्यात शरद पवार दुसऱ्या पक्षात जाताना दिसतील, असे शिरसाट यांनी स्पष्ट केले आहे.

### शिरसाट यांची मुलाखत..

संजय शिरसाट यांनी एका वृत्तवाहिनीशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी अनेक विषयांवर भाष्य केले. मानसन्मान मिळाला, तर महाविकास आघाडी म्हणून लढू, अन्यथा, स्वतंत्र निवडणूक लढू, या आमदार रोहित पवारांच्या वक्तव्याविषयी शिरसाट यांना विचारले असता ते म्हणाले, की मानसन्मानाचा प्रश्न आता येतो कुठे ? रोहित पवार यांना माहीत आहे की आपल्याला महाविकास आघाडीबरोबर राहायचे नाही.त्यांचे आजोबा दुसरा मार्ग पत्करत आहेत. काका आधीच दुसरीकडे गेले आहेत. सुप्रिया सुळे मोदींच्या नेतृत्वाखाली परदेशात गेलेल्या आहेत. त्यामुळे आता महाविकास आघाडीबरोबर राहणे, हे त्यांना पचनी पडणार नाही आणि ते राहणार पण नाहीत, असे शिरसाट म्हणाले.

### वेगळ्या धाटणीचे राजकारण..

आगामी काही दिवसातील राजकारण तुम्हाला वेगळ्या धाटणीचे पाहायला मिळेल. मला वाटते भविष्यात शरद पवार दुसऱ्या पक्षात जाताना दिसतील, असेही शिरसाट म्हणाले. सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री दिसतील का? या प्रश्नावर ते म्हणाले की हे नाकारता येत नाही.

### महाराष्ट्रात एखादे मंत्रीपद..

शिरसाट पुढे म्हणाले की, शरद पवार या महिन्याच्या अखेरीपर्यंत ‘महायुती’ त सामील होणार नाहीत. पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत उलाढाल होईल, असे राजकीय वर्तुळातून सांगण्यात येत आहे. ती माहिती खरी की खोटी माहिती नाही. पण, आता दोघे लवकरच एकत्र येतील, असे सांगत शरद पवार आणि अजित पवार एकत्र येणार असल्याचे संकेत शिरसाट यांनी दिलेत. शरद पवार हे महायुतीमध्ये आले तर कदाचित त्यांना फडणवीस सरकारमध्ये एखादे मंत्रीपद मिळेल असे संकेतही शिरसाट यांनी दिले आहेत.

### संसदेत मोठ्या घडामोडी..

पाकिस्तानला गप्प बसवण्याची संधी नरेंद्र मोदी यांनी अचूक साधली. आता देशांतर्गत जे वादग्रस्त मुद्दे आहेत, त्याबाबत नरेंद्र मोदी निर्णय घेण्याची शक्यता आहे. त्यासाठी त्यांना मोठे पाठबळ हवे असून विरोधकांनाही ‘जवळ’ करण्याचे धोरण त्यांनी आखले आहे. आता, संसदेमध्ये समान नागरी कायदा, वक्फ सुधारणा विधेयक, परदेशी नागरी विधेयकही मंजूर करून घेण्याकडे त्यांचा कल आहे. भाजपाप्रणित ‘एनडीए’ सरकारच्या या कालावधीतच देशाचा चेहरा मोहरा बदलण्याचे संकेत मोदी यांनी दिले आहेत.

ePaper

उद्धव ठाकरेंना आणखी एक धक्का, बडा नेता एकनाथ शिंदेंच्या गळाला

वर्ष - 8 । अंक - 287 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- अखेर लखनऊला सूर गवसला!
- बेन डकेटची स्फोटक खेळी!
- ...तर परिणाम भोगावे लागतील!
- प्रश्न विचारताच ट्रम्प संतापले

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 23 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## भारतीय लष्कराची पंतप्रधान मोदींकडून प्रशंसा

# माझ्या नसानसांत आता रक्ताऐवजी सिंदूर!

## पंतप्रधान मोदींचा पाकिस्तानला इशारा

। बिकानेर । प्रतिनिधी । महाईन्यूज

**‘सिंदूरचे रूपांतर दारूगोळ्यात झाल्यानंतर काय होते, याचा धडा आपल्या देशाच्या शत्रूंना आता मिळाला असेल,’ अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी पाकिस्तानला फटकारले. ‘माझ्या नसानसांत आता रक्ताऐवजी सिंदूरच वाहत आहे. २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यास आपण २२ मिनिटांत प्रत्युत्तर देताना पाकिस्तानातील नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले,’ असेही ते म्हणाले.**



ऑपरेशन सिंदूर नंतर प्रथमच एका जाहीर सभेत पंतप्रधानांनी या विषयावर भाष्य केले. पाकिस्तानी सीमेजवळ असलेल्या बिकानेर येथे बोलताना, पाकिस्तानला गुडघे टेकायला लावणाऱ्या भारतीय लष्कराची पंतप्रधानांनी या वेळी प्रशंसा केली. ‘२२ एप्रिलला पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर आमच्या सरकारने तिन्ही सैन्यदलांना मोकळीक दिली होती. आपल्या सैन्यदलांनी असा चक्रव्यूह आखला, की त्यामुळे पाकला गुडघे टेकायला लागले,’ असे पंतप्रधान म्हणाले. चोख प्रत्युत्तर देण्याचा संकल्प आम्ही सोडला होता. त्यासाठी आमच्या सरकारने तिन्ही सैन्यदलांना मोकळीक दिली होती. आपल्या सैन्यदलांनी असा चक्रव्यूह आखला की, त्यामुळे पाकिस्तानला गुडघे टेकायला लागले,’ असे पंतप्रधान म्हणाले. ‘भारताने पाकिस्तानला दिलेले प्रत्युत्तर हा केवळ सूडाचा भाग नव्हता, तर आम्ही आमच्या भगिनींना न्याय मिळवून दिला. पाकिस्तानने यापुढे पुन्हा असे दु:साहस केले तर त्यांना त्याची जबर किंमत मोजावी लागेल. त्यांच्यासोबत आता कोणत्याही प्रकारे चर्चा होणार नाही. आता चर्चा केवळ पाकिस्तानने बळकावलेल्या काश्मीरविषयीच होईल,’ अशी स्पष्टोक्तीही त्यांनी केली. ‘पाकिस्तानला यापुढे प्रत्युत्तर देताना ते कसे व कधी द्यायचे, याचा निर्णय आपले लष्कर घेईल. पाकिस्तानकडून दिल्या जाणाऱ्या अण्वस्त्रांच्या धमक्यांना आम्ही घाबरत नाही. तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, दहशतवादी कृत्याचे सूत्रधार व त्यांना आश्रय देणारे पाकिस्तान सरकार एकच आहे, असे आम्ही मानू. ऑपरेशन सिंदूरची ही त्रिसूत्री आहे,’ असे पंतप्रधानांनी सांगितले. ‘बिकानेरजवळच्या नाल विमानतळास लक्ष्य करण्याचा पाकिस्तानने प्रयत्न केला. परंतु आपण तो हल्ला उधळून लावला. त्यांचे तळ मात्र आपण उद्ध्वस्त केले. त्यांचा रहिमयार खान तळ सध्या ‘अतिदक्षता विभागा’त आहे. तो कधी पूर्ववत होईल हे कुणी सांगू शकत नाही. पाकिस्तान आपल्याशी थेट युद्धात कधीही जिंकू शकत नाही हे अनेकदा सिद्ध झाले आहे. त्यामुळेच त्यांच्याकडून दहशतवादाचे शस्त्र वापरले जाते,’ असेही पंतप्रधान म्हणाले.

भारताने २०१९मध्ये केलेल्या बालाकोट हवाई हल्ल्यानंतर पंतप्रधानांनी राजस्थानातील चुरू येथे जाहीर सभेस संबोधित केले होते. त्या सभेचा संदर्भही त्यांनी यावेळी दिला. ‘सौगंध मुझे इस मिट्टी की मै देश नही झुकने दुंगा, मै देश नही मिटने दुंगा’ असे मी त्यावेळी म्हणालो होतो. ऑपरेशन सिंदूरनंतर हे धोरण अधोरेखित झाले,’ असे पंतप्रधानांनी आवर्जून सांगितले.

### ‘मध्यस्थी नाही, थेट चर्चा’

भारत आणि पाकिस्तान यांच्यादरम्यान संघर्षविरामाबाबतची सहमती ही दोन्ही बाजूंमधील थेट चर्चेनंतरच झाली होती, अशी स्पष्टोक्ती परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी गुरुवारी केली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपण शांततेसाठी मध्यस्थाची भूमिका बजावल्याचा दावा केल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी भारताची भूमिका स्पष्ट केली.

### अमेरिकेने पुढाकार घ्यावा-शरीफ


इस्लामाबाद/ नवी दिल्ली : ‘भारताशी सौदी अरेबियामध्ये चर्चा करण्यास तयार आहोत,’ असा प्रस्ताव पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाझ शरीफ यांनी मांडला आहे. दोन्ही देशांमध्ये समेट घडविण्यासाठी अमेरिकेने पुढाकार घ्यावा, असेही शरीफ यांनी म्हटले आहे. त्रयस्थ देशाची मध्यस्थी भारताने अमान्य केल्यानंतरही पाकने ही भूमिका मांडली आहे

# जिल्ह्यात 'बालपुस्तक जत्रे'साठी प्रयत्न!

## उद्योग आणि मराठी भाषामंत्री उदय सामंत यांचे पुण्यात उद्गार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'मुलांना वाचनाची गोडी लावणारी, पारंपरिक खेळ शिकवणारी बालपुस्तक जत्रा ही पुण्यापुरती मर्यादित राहता नये. हा उपक्रम राज्यभरात झाला पाहिजे,' असे मत उद्योगमंत्री आणि मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी मांडले. प्रत्येक जिल्ह्यात बालपुस्तक जत्रा राज्य सरकारच्या माध्यमातून आयोजित करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी नमूद केले.**



राष्ट्रीय पुस्तक न्यास, पुणे पुस्तक महोत्सव, पुणे महानगरपालिका आणि संवाद पुणे यांच्यातर्फे गणेश कला क्रीडा केंद्र येथे आयोजित पुणे बालपुस्तक जत्रेच्या उद्घाटनावेळी सामंत बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे, पुणे महापालिकेच्या सांस्कृतिक विभागाचे उपायुक्त सुनील बल्लाळ, नाट्यगृह विभागाचे मुख्य व्यवस्थापक राजेश कामठे, लेखिका डॉ. संगीता बर्वे, ज्येष्ठ साहित्यिक ल. म. कडू, साहित्यिक राजीव तांबे, संवाद पुणेचे सुनील महाजन, प्रसेनजित फडणवीस, कृष्णकुमार गोयल, शिरीष देशपांडे या वेळी उपस्थित होते.सामंत म्हणाले, 'पूर्वीची लहान मुले आणि आताची लहान मुले यांच्यातील फरक आपला स्पष्ट जाणवतो. अंगणात खेळ खेळणारी मुले पूर्वी फारशी आजारी पडत नव्हती. पुस्तकांना भारतीय पारंपरिक खेळांची जोड दिल्याने ही जत्रा नावीन्यपूर्ण झाली आहे. त्यामुळे पुणे बालपुस्तक जत्रेसारखे उपक्रम राज्यभरात झाले पाहिजेत.'लहानपणी खेळल्याचा फायदा आज कळत आहे. तंदुरुस्त राहणे, एकाग्रता वाढण्यासाठी हे खेळ उपयुक्त ठरतात. पुस्तक वाचनाचा आनंद लॅपटॉपवर वाचून मिळत नाही. त्यामुळे मुलांनी वाचनासह पारंपरिक भारतीय खेळ खेळण्यावर भर द्यायला हवा,' असे मिसाळ यांनी सांगितले. 'भारतीय खेळ खेळल्याने मुलांचे आरोग्य चांगले राहते, व्यक्तिमत्त्व विकास चांगला होतो. वाचन संस्कृती वाढण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रमांना राज्य सरकार नेहमीच पाठिंबा देईल,' असे पाटील यांनी नमूद केले. पांडे म्हणाले, 'पुणे पुस्तक महोत्सवाला पुणेकरांचा भरभरून प्रतिसाद मिळतो. दिल्लीतील वर्ल्ड बुक फेअरमध्ये मुलांसाठी वेगळा विभाग असतो. त्या धर्तीवर मुलांसाठी बालपुस्तक जत्रा आयोजित करण्याची कल्पना पुढे आली.बालपुस्तक जत्रेमध्ये भोवरा,फिरवणे, विटीदांडू अशा खेळांचाही समावेश आहे. त्यामुळे पालक, मुले हे खेळ खेळण्यात रमले होते. काही पालक मुलांना भोवरा कसा फिरवायचा हे शिकवत होते. तर काही पालकांनीही हे खेळ खेळून त्यांच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला.

### 'पारंपरिक खेळ' पुस्तकाचे प्रकाशन

जुन्या भारतीय खेळांच्या माहिती संकलन करून रेवा पांडे यांनी लिहिलेल्या 'पारंपरिक खेळ' या पुस्तकाचे प्रकाशन शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त शकुंतला खटावकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले आहे. 'मला दोन-तीनच पारंपरिक खेळ माहीत होते. मात्र, माझ्यासारख्या अनेकांना जुन्या खेळांविषयी माहिती नाही. त्यामुळे एक पुस्तक लिहिण्याची कल्पना सुचली,' असे रेवा पांडे यांनी सांगितले.'मुलांना वाचनाची गोडी लावणारी, पारंपरिक खेळ शिकवणारी बालपुस्तक जत्रा ही पुण्यापुरती मर्यादित राहता नये. हा उपक्रम राज्यभरात झाला पाहिजे,' असे मत उद्योगमंत्री आणि मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी मांडले.

# हगवणेंकडून मलाही आमंत्रण पण मी गेले नाही!

## , वैष्णवी हगवणेंच्या प्रकरणावर सुप्रिया सुळे संतापल्या?

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील वैष्णवी हगवणेचे प्रकरण अतिशय खेदजनक आहे. समाज म्हणून आपल्यासाठी ही लाजिरवाणी घटना आहे. हुंड्याच्या विरोधात देशात फार पूर्वी कायदा झालेला आहे. गुन्हेगार कुणीही असले तरी त्यांना शासन झालेच पाहीजे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी कारवाईचे आश्वासन दिले असले तरी त्यात सातत्य ठेवावे. हा सामाजिक विषय असून यात आम्हाला राजकारण करायचे नाही", अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार) खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी बोलताना मांडली.**



समाज म्हणून आपल्याला काळिमा फासणारी घटना आहे, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या. एकाच घरातील दोनही सुना जर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार करत असतील तर एवढे शिक्षण घेऊन हगवणे कुटुंबाने काय केले? असा प्रश्न निर्माण होतो. पाश्चिमात्य कपडे घालूनही बुरसटलेले विचार गेलेले नसतील तर शिक्षणाचा तरी काय उपयोग. हगवणेंच्या घरात काही क्रांती घडलीच नाही, असे वाटते. पुरोगामी विचारांचा अपमान हगवणे कुटुंबाने केला आहे, अशीही टीका सुप्रिया सुळे यांनी केली.हगवणे कुटुंब हे माझ्याच लोकसभा मतदारसंघात मोडते. एक महिन्यापूर्वी त्यांच्या घरातील एका कार्यक्रमाचे आमंत्रण त्यांनी मला दिले होते. मात्र घरातील सुनांनी कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार दाखल केली असल्याची माहिती मला होती, त्यामुळे मी त्या कार्यक्रमाला जाणे टाळले, असेही सुप्रिया सुळे यांनी सांगितले.तसेच या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवारही गेले नव्हते. ते काही वर्षांपूर्वी झालेल्या लग्नाला नक्कीच गेले होते. पण तेव्हा हगवणे कुटुंबाबाबतची माहिती त्यांना नसावी, असेही सुप्रिया सुळे यांनी सांगितले. बीडमधील संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी माध्यमांनी शौर्य दाखवत ती बातमी लावून धरली होती. म्हणूनच संतोष देशमुख यांच्या हत्येचा तपास सुरळीत होऊ शकला. त्याप्रमाणेच याही प्रकरणात माध्यमांनी वैष्णवीला न्याय मिळवून देण्यासाठी हे प्रकरण लावून धरावे, असे आवाहन सुप्रिया सुळे यांनी केले. महाराष्ट्र सरकारनेही कडक कारवाई करून कोणत्याही कुटुंबाची सुनेला त्रास देण्याची हिंमत व्हायला नको, असेही त्या म्हणाल्या.वैष्णवीच्या मृत्यूनंतर गेले सहा दिवस तिच्या बाळाचे हाल झाले, अशी माहिती आता समोर येत आहे. स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यात लक्ष घातल्यानंतर आज ते बाळ वैष्णवीच्या कुटुंबांकडे सुपूर्द करण्यात आले. बाळाचा विषय अतिशय संवेदनशीलपणे हाताळावा लागेल, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या. हगवणे कुटुंबिय तुरुंगात आहेत, काही सदस्य फरार आहेत. अशा वातावरणात मुल ठेवायची कुणाचीच हिंमत होणार नाही. त्यामुळे त्या बाळाची देखभाल आजी-आजोबांनी घेतलेली चांगली.

### बाळ त्या संस्कारात वाढायला नको

कायदा आपले काम करेल. पण आम्ही माणुसकीच्या नात्याने आम्ही यात लक्ष घालू, असेही त्या म्हणाल्या.पुण्यातील वैष्णवी हगवणेचे प्रकरण अतिशय खेदजनक आहे. समाज म्हणून आपल्यासाठी ही लाजिरवाणी घटना आहे. हुंड्याच्या विरोधात देशात फार पूर्वी कायदा झालेला आहे. गुन्हेगार कुणीही असले तरी त्यांना शासन झालेच पाहीजे.

## अनधिकृत होर्डिंग कारवाईला

# अडथळा निर्माण करणाऱ्याविरुद्ध गुन्हे नोंदवणार!

## पीएमआरडीए महानगर आयुक्त यांची भूमिका

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीत केलेल्या सर्वेक्षणात साडेनऊशे पेक्षा अधिक अनाधिकृत होर्डिंग असल्याचे समोर आले आहे. त्यावर कारवाई सुरू असून या कारवाईला विरोध/अडथळा निर्माण करणाऱ्याविरुद्ध थेट गुन्हे नोंदवणार असल्याची भूमिका पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी घेतली आहे. महानगर आयुक्त यांनी गुरुवारी विभागप्रमुखांची आढावा बैठक घेत, पीएमआरडीए हद्दीतील सर्व अनाधिकृत होर्डिंग काढण्याचे निर्देश दिले.**




पीएमआयडीएने केलेला सर्वेक्षणात ९६७ अनाधिकृत होर्डिंग आढळून आले आहे. त्यातील जवळपास ९० होर्डिंग अनाधिकृत बांधकाम व निर्मूलन विभागाच्या माध्यमातून काढण्यात आले आहे. रहदारीस अडथळा आणणाऱ्या तसेच लोकांच्या जीवितावा धोका निर्माण होईल अशा अनाधिकृत होर्डिंगवर सोमवारपासून धडक कारवाईचे निर्देश महानगर आयुक्त डॉ. म्हसे यांनी दिले आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने लाखो भाविक पालखी मार्गावरून जात असतात. या मार्गावरील अनाधिकृत होर्डिंग तातडीने काढावेत. यासह उर्वरित होर्डिंगसाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करून ते दोन महिन्यात कसे काढले जातील, त्या दृष्टीने नियोजन करण्याचे निर्देश यावेळी डॉ. म्हसे यांनी दिले. पावसाळ्याच्या दृष्टिकोनातून पीएमआरडीए हद्दीतील नालेसफाईला प्राधान्य देत नदी – नाल्याचा प्रवाह मार्गात असलेले राडारोडा दूर करावा. जेणेकरून त्या हद्दीतील नागरिकांना पुराचा धोका निर्माण होणार नाही. यावेळी अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, दक्षता अधिकारी तथा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, विकास परवानगी व नियोजन विभागाचे संचालक सुनील मरळे, मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे, अनधिकृत बांधकाम व निर्मूलन विभागाच्या सह आयुक्त डॉ. दीप्ती सूर्यवंशी – पाटील, सह महानगर नियोजनकार श्वेता पाटील, उपजिल्हाधिकारी प्रमोद कुदळे, रवींद्र रांजणे यांच्यासह अनधिकृत होल्डिंग काढणाऱ्या संबंधित एजन्सीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### हानी झाल्यास गुन्हा नोंदवणार..

ज्या ठिकाणी अनाधिकृत होर्डीमुळे कुठली मनुष्यहानी किंवा इतर काही दुर्घटना घडल्यास त्यास संबंधित जागामालक आणि जाहिरात एजन्सीला जबाबदार धरून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने आतापर्यंत सणसवाडी आणि भुकूम या ठिकाणी दोन गुन्हे नोंदविण्यात आले आहे.

## 'तो' बीटनिरीक्षक आधीच निलंबित

## महापालिकेकडून 36 अनधिकृत बंगले धारकांनी केलेल्या आरोपांवरून पुन्हा नोटीस

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड: चिखली येथील इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेत बांधलेल्या ३६ अनधिकृत आलिशान बंगल्यांवरील कारवाईच्या वेळी शिरसाठ नावाच्या बीट निरीक्षकाने पैसे घेतल्याचा आरोप बंगले मालकांकडून करण्यात आला. दरम्यान, आरोप झालेल्या संबंधित बीट निरीक्षकाला नोटीस बजावत खुलासा मागविण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेचे उपायुक्त मनोज लोणकर यांनी दिली.**




इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेत सुमारे ७ हजार २४५ चौरस मीटर क्षेत्रफळावर हे दोन ते तीन मजली आलिशान अनधिकृत बंगले उभारण्यात आले होते. ही बांधकामे पूर्णपणे बेकायदेशीर असल्याने सर्वोच्च न्यायालय आणि राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशामुळे महापालिकेने ते बंगले पाडण्यात आले.कारवाईच्या वेळेस बंगलेधारक नागरिकांनी शिरसाठ नावाचा बीट निरीक्षक आमच्याकडून ५० हजार ते एक लाख रुपये घेऊन जायचा, असा आरोप जाहीरपणे केला आहे. पैसे घेऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्या बांधकामांना अभय दिल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. मनोज लोणकर यांनी सांगितले की, संबंधित बीट निरीक्षक संतोष शिरसाठ हा कनिष्ठ अभियंता दुसऱ्या प्रकरणात निलंबित असून, त्याची खातेनिहाय चौकशी सुरू आहे. अद्याप चौकशी अहवाल प्राप्त झालेला नाहीत. त्यामुळे तो कर्मचारी निलंबित आहे. बंगलेधारकांनी केलेल्या आरोपांबाबत संबंधित शिरसाठ याला या प्रकरणात देखील नोटीस बजावत त्याच्याकडून खुलासा मागविला आहे.

### काय कारवाई होते, याची उत्सुकता

कारवाईच्या वेळेस बंगलेधारक नागरिकांनी शिरसाठ नावाचा बीट निरीक्षक आमच्याकडून ५० हजार ते एक लाख रुपये घेऊन जायचा, असा आरोप जाहीरपणे केला आहे. पैसे घेऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्या बांधकामांना अभय दिल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. अखेर, महापालिका प्रशासनाला याची दखल घ्यावी लागली आहे. मनोज लोणकर यांनी सांगितले की, संबंधित बीट निरीक्षक संतोष शिरसाठ या कनिष्ठ अभियंता दुसऱ्या प्रकरणात निलंबित असून, त्याची खातेनिहाय चौकशी सुरू आहे. अद्याप चौकशी अहवाल प्राप्त झालेला नाहीत. त्यामुळे तो कर्मचारी निलंबित आहे. बंगलेधारकांनी केलेल्या आरोपांबाबत संबंधित शिरसाठ याला नोटीस बजावत त्याच्याकडून खुलासा मागविला आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले, तसेच सर्व चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनीही पूर्वीच स्पष्ट केले आहे. त्यामुळे शिरसाठ यांच्यावर काय कारवाई होते, याची उत्सुकता निर्माण झाली आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### गुरूवर अत्यंत श्रद्धा ठेवावी.

**कुस्त्या खेळून, झगडून, शरीरबळ वाढते; अवघड उदाहरणे सोडवून बुद्धिबळ वाढते; तसेच, आलेल्या परिस्थितीला तोंड देऊन समाधानाने राहण्याने आत्मिक बळ वाढते. आत्मिक बळ वाढणे म्हणजे देहबुद्धी कमी होणे; आणि ते करण्याकरिताच परमेश्वर संकटे धाडतो; पण तुम्ही त्यांना भिता याला काय म्हणावे ? अशा स्थितीत, संकटे परत घेणे म्हणजे तुमचे अनहित करणे होय. त्याला तुमचे हित कशात आहे हे उत्तम कळते. भोग समाधानाने भोगण्यात पुरुषार्थ आहे. दुखणे आले असता औषध घ्यावे. पण औषधात गुण तरी परमात्म्यानेच ठेवला ना ? औषधाने तरी गुण हमखास येतोच असे थोडेच आहे ? एकाला येतो, एकाला नाही. ज्याचे ज्यात हित होणे असेल तसे तो परमात्मा करतो हे लक्षात ठेवावे. तुम्ही एकच करावे, परमात्म्याला शरण जाऊन, " हा भोग भोगण्याची मला ताकद दे, समाधान भंगू देऊ नकोस, तुझे सतत स्मरण व्हावे, " असे मागावे. दुखणे भोगायचे आहे तर ते समाधानाने का नाही भोगू ? प्रारब्धाचे तुमच्या डोक्यावरचे ओझे, कर्ज तेवढ्या प्रमाणात कमी नाही का होणार ? दुखणे आले असता त्याची उपेक्षाच करावी, म्हणजे आपोआप ते कमी होईल.**

**मी म्हणजे अमुक एक, अशी आपल्या अस्तित्वाविषयी जशी खात्री असते, तशी देव आहे अशी खात्री पाहिजे. आपले सद्‌गुरू देवच आहेत अशी आपली खात्री झाली, म्हणजे आपला सद्‌गुरूंच्या ठिकाणी भाव आहे असे म्हणता येईल. माझी सेवा तुम्ही जी करता ती तुम्ही आपल्या देहबुद्धीची केली, तुम्हाला जे पसंत तसे तुम्ही केले. वास्तविक, माझी सेवा म्हणजे मला जे आवडते ते करणे, माझ्या आज्ञेत राहणे, नामस्मरण करणे, सर्वांभूती भगवद्भाव ठेवून कुणाचे मन न दुखवणे, परमात्माच सर्व करतो अशी भावना ठेवणे. माझ्या सांगण्याचा परिणाम न होण्याची दोन कारणे असतील : एक कारण असे की, तुमच्या मनामध्ये परिवर्तन घडवून आणण्याची शक्तीच माझ्यामध्ये नसेल; किंवा दुसरे कारण असे की, तुम्ही अभ्यास करीत नसाल. पण परमार्थात एकदम फरक होणे बरे नव्हे. समजा, एखाद्याला आज १०५ डिग्री ताप आहे आणि उद्या तो एकदम 95 डिग्री झाला, तर ते बरे नाही. तसेच, मनुष्य आज रागीट आणि उद्या एकदम शांत झाला, तर तेही बरे नव्हे. आपल्यामध्ये हळूहळू परिवर्तन व्हावे, आणि ते विवेकाने घडवून आणावे.**

**बोधवचन:- भजन, पूजन, नामस्मरण इत्यादि आपण जे करतो. ते आपल्या मनापर्यंत पोहोचले पाहिजे. तरच त्याचा योग्य परिणाम लवकर दिसू लागेल.**



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

# काँग्रेस सारे नेते झालेत, थेट पाकड्यांचे प्रवक्ते



**हल्ली वारंवार असे म्हटले जाते.. विनाशकाले विपरीत बुद्धी ! पण, देशातल्या काँग्रेसची अवस्था आता विपरीतकाले विनाश बुद्धी ! अशी झाली आहे. काँग्रेसच्या नेत्यांना देशद्रोहाचा आजार जडला आहे की काय? असा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे ! डोके फिरल्यासारखे किंवा पाकिस्तानने प्रवक्तेपद दिल्यासारखे हे नेते बोलत आहेत सरकारवर गरळ ओकत आहेत, हे लक्षात आले असेलच..**

### सगळ्यांनाच देशद्रोहाचा आजार..

काँग्रेसचे मोठे नेतृत्व म्हणजे राहुल गांधी.. त्यांच्यापासून ते प्रादेशिक नेते विजय वडेट्टीवार, नाना पटोले, नवे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यापर्यंत सगळ्यांचीच अवस्था देशद्रोही वक्तव्ये करण्यापर्यंत गेली आहे, हे दुर्दैवाने म्हणावेसे वाटते.

### विजय वडेट्टीवारांचा जावईशोध..

'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान पाकिस्तानचे अनेक ड्रोन आणि क्षेपणास्त्रे भारताने पाडली, पण विजय वडेट्टीवार यांनी त्याबद्दल वेगळीच भूमिका मांडली आहे. पातळयंत्री, नतद्रष्ट विचार म्हणजे काय, याचा बाजारच जणू त्यांनी मांडला आहे.. दहशतवाद विरोधी कारवाईच्या वेळी भारताने पाकिस्तानचे अनेक दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. ते सर्व यशस्वी झाले, पण त्याच्या दुसऱ्या दिवशी पाकिस्तानने पाचशेपेक्षा जास्त ड्रोन आणि क्षेपणास्त्रे सोडली, ती सर्वच्या सर्व भारताने पाडली, ही वस्तुस्थिती आहे, पण वडेट्टीवार यांनी तिसरेच त्रैराशिक मांडले आहे.

### पंचपक्वांनामध्ये घाण शोधणारी औलाद..

समोरची पंचपक्वान्नांची मेजवानी सोडून त्यात घाण कुठे दिसते का आणि ती मला केव्हा मिळते, याचा शोध घेणारी काही मंडळी असतात, त्यात आता वडेट्टीवार हे नाव अगदी आदराने घेतले जाईल. दीनानाथ मंगेशकर प्रकरणाच्या वेळी त्यांनी भारतरत्न लता मंगेशकर यांच्यावर अशीच गरळ ओकली होती, ते सर्वांनाच आठवत असेल!

### कुठे ते कारवाईचे यश, कुठे हे भंपक त्रैराशिक..

वडेट्टीवार यांनी म्हटले आहे की पाकिस्तानने सोडलेल्या ड्रोनची किंमत फक्त पंधरा हजार रुपये होती. पण, ते पाडण्यासाठी वापरलेल्या भारताच्या क्षेपणास्त्राची किंमत पंधरा लाख होती. हा त्यांचा ठोकताळा अगदी बिनडोकपणाचा आहे. काडेपेटीतल्या एका काडीची किंमत चार आणे सुद्धा नसते, पण, तीच काडी वडेट्टीवार यांची आयुष्याची कमाई उद्ध्वस्त करू शकते, एवढा साधा विचार सुद्धा या भंपक माणसाकडे नसावा, याचे आता आश्चर्य वाटू लागले आहे !

### एक से एक भंपक, कुणाला नावे ठेवणार ?

पहलगामच्या भ्याड हल्ल्यानंतर काँग्रेसने बऱ्यापैकी समजूतदारीची भूमिका घेतली होती, असे वाटले. पण, त्यानंतर राहुल गांधी यांना जबाबदारी ओळखून भूमिका घेता आली असती. काही दिवस उलटले आणि राहुल गांधी मूळपदावर आले. युद्धाचे वातावरण असते तेव्हा जनता देशाच्या हितासाठी सरकारच्या पाठीशी उभी राहाते. पण, राहुल गांधी यांचा मोदीद्वेष आता हळूहळू राष्ट्रद्वेष बनत चालला आहे, हे पुन्हा एकदा पटले. बिहारमध्ये राहुल गांधी गेले तेव्हा काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी थोडी गर्दी जमवली. तिथे राहुल गांधी यांनी जातीय जनगणनेचा उल्लेख करुन मोदी यांना अरेतुरे सुरु केले. वैयक्तिक राग सार्वजनिक ठिकाणी काढण्याचा फटका, या आधी काँग्रेसला बसलेला आहे, हे त्यांना समजले नाही का ?

### कुठे जयशंकर, कुठे राहुल गांधी?

आता राहुल गांधी यांनी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांना 'टार्गेट' केले आहे. जयशंकर यांनी भारताच्या कारवाईचा म्हणे, इशारा पाकिस्तानला दिला होता, असा सनसनाटी आरोप राहुल गांधी करीत आहेत. याबाबत लष्कर आणि परराष्ट्र मंत्रालय यांनी वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे. भारताचे लष्कर जगातील एक प्रमुख लष्कर आहे. संकेत, नियोजन, अंमलबजावणी याबाबत लष्कराच्या क्षमतेवर स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत कोणी शंका उपस्थित केलेली नाही. अगदी १९६२ च्या युद्धात भारताचे नुकसान झाले, तरीही लष्कराची कामगिरी इतिहासात नोंद आहे. पण, आता लोकसभेतील विरोधी पक्षनेता केवळ वैयक्तिक द्वेष व्यक्त करण्यासाठी नको ते आरोप करतो, हे देशासाठी हानिकारकच आहे.

### काँग्रेस म्हणजे बुडत्याचा पाय खोलात !

राहुल गांधी यांच्या संदर्भात काँग्रेस पक्षात उघड उघड दोन गट आहेत. राहुल गांधी यांच्या निकटच्या वर्तुळात असलेले पक्षाध्यक्ष खर्गे आधी काहीतरी बोलतात आणि नंतर भलतीच विधाने करीत कोलांटउड्या मारत राहतात. वस्तुनिष्ठ भूमिका घेणारे नेते एकतर गप्प बसत आहेत किंवा पक्षातून बाहेर पडण्याची तयारी करीत आहेत. पवन खेरा नावाचे नेते पक्षाचे मुख्य प्रवक्ते आहेत, पण संजय राऊत यांची हिंदी एडिशन आहेत. काय बोलावे, याचे भान नाही, पक्ष संपवत चालले आहेत, एवढेच महत्त्वाचे!

### बेजबाबदार नेता, दिशाहीन कार्यकर्ते..

राहुल गांधी हा माणूस विरोधी पक्षनेता असताना एवढा बेजबाबदारपणे वागतो, तो पुढे चुकून कधी पंतप्रधान वगैरे झाला तर काय होईल? याची कल्पना करणे अशक्य आहे. सध्या तो पेरत असलेला भंपकपणा आणि देशद्रोह पुढे उगवणार आहे, हे मुद्दाम सांगावेसे वाटते !

### अभ्यासूंचे पंख कापण्याची तयारी..

काँग्रेसमध्ये सध्या अकलेची दिवाळखोरी सुरू आहे. शशी थरुर यांच्यासारख्या अभ्यासू नेत्याचे पंख कापण्याची तयारी पक्षात सुरु आहे. राष्ट्रीय पातळीवर भूमिका मांडण्यासाठी फारसे कोणी पक्षात उरलेले नाही आणि राहुल गांधी यांना नेतृत्व करणे झेपत नाही, हे सांगणारे कोणी नाही. खर्गे यांना चिडचिड करणे एवढेच समजते. अशा परिस्थितीत काँग्रेस पक्ष पुन्हा कसा उभा राहणार, हा मोठा प्रश्न आहे.

### युवकांनी कोणती अपेक्षा बाळगायची?

काँग्रेस पक्षाकडे नवी पिढी वळत नाही, हे मतदानावरून कळते. पण, नव्या पिढीपुढे ठेवण्यासारखा अजेंडा काँग्रेसकडे आहे का ? नरेंद्र मोदी सरकारने कोणतेही पाऊल उचलले, तर फक्त टीका करायची, एवढेच राहुल गांधी आणि कंपनीला माहित आहे. समर्पक भूमिका, विकासाचा दृष्टिकोन, शेतकऱ्यांसाठी, महिलांसाठी काही ठोस पावले आणि युवा पिढीसाठी मोठी झेप घेणारी बुद्धिमत्ता.. सगळ्यांचाच काँग्रेसकडे आभाव आहे. भारतीय जनता पार्टीच्या झंजावातात हा पक्ष पुढे येणे शक्य वाटत नाही. स्वातंत्र्यानंतर कित्येक वर्षे भारतात सत्तेवर काँग्रेस पक्ष होता, असे म्हणायची वेळ येऊ नये, एवढीच या 'भंपक गँग' कडून अपेक्षा!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.




# सरकारविरोधात अवाक्षरही नकोच?

**उजव्या विचारसणीच्या अनेकांनी कर्नल सोफिया कुरेशी यांचं कौतुक केल्याचं पाहून खूप आनंद झाला. पण कौतुक करणाऱ्यांनी त्या मुस्लिमांच्या बाजूनेही तेवढ्याच ठामपणे उभं राहावं, ज्यांचे झुंडबळी घेतले गेले, ज्यांची घरं नियम धाब्यावर बसवून बुलडोझरने जमीनदोस्त केली गेली आणि जे भाजपच्या मुस्लीमद्वेष्ट्या वृत्तीमुळे भरडले गेले. त्यांनाही भारताचे नागरिक म्हणून संरक्षण मिळावं यासाठीही आग्रह धरला गेला पाहिजे.**



दोन महिला जवानांनी ऑपरेशन सिंदूरची माहिती जगापर्यंत पोहोचविल्यामुळे निर्माण झालेली प्रतिमा महत्त्वाची आहेच पण ही प्रतिमा वास्तवात प्रतिबिंबित होत नसेल, तर ते केवळ ढोंग ठरेल...'' अशोका विद्यापीठाचे प्राध्यापक आली खान महमुदाबाद यांनी ८ मे रोजी समाजमध्यमावर केलेल्या पोस्टचा हा अंश. या पोस्टमुळे त्यांना गेल्या रविवारी (१८ मे) भल्या पहाटे अटक झाली. सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी (२१ मे) त्यांना अंतरिम जामीन मंजूर केला असला, तरीही आजच्या काळातल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मर्यादा जाणून घेण्याच्या दृष्टीने हे प्रकरण महत्त्वाचं ठरेल.हरियाणा राज्य महिला आयोग आणि त्याच राज्यातल्या जेठारी गावचे सरपंच आणि हरियाणा भाजप युवा मोर्चाचे महासचिव योगेश जेठारी यांनी केलेल्या दोन स्वतंत्र एफआयआरअंतर्गत डॉ. अली खान यांच्यावर ही कारवाई केली गेली. या अटकेचा घटनाक्रम भारतात पोलीस किती तत्पर असू शकतात हे सिद्ध करणारा आहे. जेठारी यांनी शनिवारी, १७ मे रोजी रात्री आठच्या सुमारास हरियाणातल्या सोनिपत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावेळ प्रा. अली खान दिल्लीतल्या आपल्या घरी होते. दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी पहाटे साडेसहा वाजता १५-१६ पोलीस त्यांच्या घरी गेले आणि त्यांना अटक करण्यात आली. रविवार असल्यामुळे त्यांना साहजिकच कोणतीही कायदेशीर मदत मिळणं शक्य नव्हतं. त्यांना रात्र कस्टडीतच काढावी लागणार, हे स्पष्ट होतं. त्यानंतर त्यांना दिल्लीतून हरियाणात नेण्यात आलं. आरोपीला असं एका राज्यातून दुसऱ्या राज्यात नेताना 'ट्रान्झिट रिमांड' सादर करावा लागतो. हा नियम पाळण्यात आला की नाही, याविषयी स्पष्टता नाही.खरंतर पोलीस प्रा. खान यांना ठाण्यात उपस्थित राहण्यासाठी, चौकशीसाठी समन्स बजावू शकले असते. पण त्या समाजमाध्यमी पोस्टमध्ये नक्कीच काहीतरी अतिशय गंभीर आढळलं असावं, ज्यामुळे त्यांना थेट दुसऱ्या राज्यात जाऊन लगोलग अटक करण्यात आली. पोलिसांची काही चूक नाही म्हणा कारण 'भारतीय न्याय संहितेच्या' ज्या कलमांखाली एफआयआर नोंदवण्यात आला, त्यात 'भारताच्या सार्वभौमत्वाला, ऐक्याला आणि एकात्मतेला धोका निर्माण करणे', 'धार्मिक भावना भडकवणे', 'वैरभाव जागृत करणे', 'सैन्यदलातील महिलांना तुच्छ लेखणे' आणि अन्यही काही गंभीर कलमांचा समावेश आहे.वर दिला आहे तो या पोस्टचा अगदी लहानसा अंश आहे. मूळ पोस्ट प्रदीर्घ आणि दोन भागांत विभागलेली आहे. त्यात 'ऑपरेशन सिंदूर' बद्दल भारताचं अभिनंदन करण्यात आलं आहे. 'दहशतवादी हल्ला हे देशावरील आक्रमण मानलं जाईल,' या भारताच्या नव्या भूमिकेची प्रशंसा आहे. युद्ध करून पाकिस्तानला संपवून टाका ही भावना ज्यांनी व्यक्त केली त्यांच्यावर टीकाही त्या पोस्टमध्ये आहे आणि त्या टीकेचं समर्थन म्हणून, "युद्ध हे केवळ राजकीय पक्ष आणि बड्या कंपन्यांसाठी लाभदायक असतं. त्याचा सर्वाधिक फटका गरिबांना बसतो. युद्ध लढणं मॉक ड्रिलमध्ये सहभागी होण्याएवढं सोपं नसतं. आपापल्या घरात सुरक्षित बसून युद्ध हवं म्हणणाऱ्यांनी सीमेवर लढणाऱ्यांच्या, त्यांच्या कुटुंबियांच्या, सीमाभागात मृत्यूच्या सावटाखाली जगणाऱ्या गावकऱ्यांच्या भावना समजून घ्याव्यात, असं आवाहन त्यात आहे. सीमेपलीकडेही माणसंच राहतात. एखादा देश संपवून टाकण्यात यावा, अशी इच्छा जेव्हा व्यक्त होते तेव्हा त्यात किती निष्पापांचे बळी जाणार असतात, याचंही भान राखलं पाहिजे," याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न त्या पोस्टमध्ये करण्यात आला आहे. हा सारा वाद उद्भवला तो नेमका मध्यप्रदेशातील भाजपचे मंत्री कुंवर विजय शहा यांनी कर्नल सोफिया कुरेशी यांना 'दहशतवाद्यांची बहीण' म्हणून संबोधल्याच्या पार्श्वभूमीवर. प्रा. अली खान यांच्या वक्तव्याने एवढा सात्विक संताप आलेल्या भाजप नेत्यांपैकी कोणीही तो व्हिडिओ पाहिला नसावा. अन्यथा ते मुक्तपणे फिरताना कसे दिसले असते.

## प्रासंगिक »

### पाऊस पडतो!

***मेच्या उत्तरार्धात काही दिवस पडणारा वळवाचा पाऊस अलीकडे अजिबात पडत नाही, अशी निरीक्षणे अगदी गेल्या वर्षीपर्यंत ताजी होती.***

यंदा तो इतका पडला आहे किंवा पडतो आहे, की त्या पावसाच्या पाण्यात ही निरीक्षणे पार धुवून गेली आहेत. आपल्या स्मृती तशाही फार अल्पकालीन झाल्या आहेत, त्यात पावसाच्याही. विज्ञानाला, वैज्ञानिक निरीक्षणांना, संख्याशास्त्राला असे करणे मानवत नाही, हे बरे. अन्यथा, यंदाच्या उन्हाळी हंगामाच्या उत्तरार्धात पडणारा पाऊस 'असामान्य' आहे, असे हवामान- यंत्रणा मान्य करत्या ना. पण या पावसाने आपल्या शहरांची इतकी दाणादाण उडावी हे मात्र आपण कोणत्याही अनुभवातून काहीही शिकत नाही याचे द्योतक. भारतीय हवामान विभागाची आकडेवारी सांगते आहे, की महाराष्ट्राचा विचार करता, एक मे ते २१ मे या कालावधीत जो सरासरी पाऊस पडतो, त्यापेक्षा ५१० टक्के अधिक पाऊस यंदा झाला आहे.

'जल जीवन मिशन' ही केंद्र सरकारची एक प्रमुख योजना आहे. 'हर घर, सुरक्षित जल' अशी घोषणा देऊन, २०२४ पर्यंत १०० टक्के कार्यात्मक घरगुती नळ कनेक्शन (एफएचटीसी) प्रदान करण्यासाठी २०१९ मध्ये 'जल जीवन मिशन' सुरू करण्यात आले. अलीकडील राष्ट्रीय नमुना पाहणीच्या (एनएसएसओ) आकडेवारीवरून असे दिसून येते.

# 'जल जीवन मिशन' 90 टक्के 'डन'



जवळपास ९० टक्के ग्रामीण कुटुंबांना नळजोडणी सुविधा उपलब्ध आहे. 'वर्क डन' ची आतापर्यंतची ही प्रगती पाहाता पुढल्या चार वर्षांत, म्हणजे २०२८ पर्यंत उर्वरित घरांनाही नळजोडण्या मिळतीलच, अशी अपेक्षा आहे.पण 'नळजोडणी', नळाच्या पाण्याची उपलब्धता आणि वापर यांमध्ये मोठी तफावत आहे, हे या योजनेपुढले खरे मोठे आव्हान. ग्रामीण भागातील फक्त ३९ टक्के कुटुंबे, पाण्याचा प्राथमिक स्रोत म्हणून नळांचा वापरू शकतात (आकडेवारी २०२२-२३ मधील राष्ट्रीय नमुना पाहणी- ७९ची ). शिवाय, नळाच्या पाण्याचा वापर वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये मोठ्या प्रमाणात भिन्न आहे. उत्तर प्रदेश, झारखंड, बिहार, पश्चिम बंगाल आणि ओडिशा यांसारख्या राज्यांमध्ये नळाच्या पाण्याचा वापर खूपच कमी – म्हणजे फक्त सहा टक्क्यांपासून ते फारतर ३० टक्क्यांपर्यंत आहे. नळाच्या पाण्याची उपलब्धता आणि वापर यांतील तफावत जर इतकी असेल, तर 'जल जीवन मिशन' कार्यक्षम आहे असे कसे म्हणता येईल?कार्यक्षमतेपुढे आव्हाने आहेतच, आणि त्यांतील काही आव्हाने सरकारच्याच निर्णयांमुळे निर्माण झालेली किंवा संरचनात्मक आहेत. 'इंडियन एक्स्प्रेस' सारख्या वृत्तपत्रांनी याविषयी सरकारी निर्णयांच्या बातम्याही वेळोवेळी दिल्या आहेत. त्यातून केंद्र सरकारकडून आर्थिक मदतीमध्ये कपात, राज्य पातळीवर नोकरशाही अनियमितता आणि या योजनेच्या पायाभूत सुविधांच्या बांधकामात घोटाळेसुद्धा झाल्याचे दिसून येते. त्यामुळे जेजेएमची प्रगती मंदावली आहे. आर्थिक भार वाढतोच आहे पण पायाभूत सुविधा अपूर्ण आहेत, अशी स्थिती येण्याचे मोठे कारण म्हणजे निविदांच्या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव. या समस्यां सोडवसाठी केंद्र, राज्य आणि स्थानिक सरकारांकडून विचारविनिमय आवश्यक असला तरी, दैनंदिन जीवनात नळ-पाण्याच्या पायाभूत सुविधा कशा चालवल्या जातात – म्हणजे त्यांचे व्यवस्थापन कसे केले जाते, यावरच बरेच काही अवलंबून आहे. नाहीतर 'नळ आहे, पण पाणी नळाचे नाही' ही स्थिती कायम राहील.व्यवस्थापनाच्या पातळीवरल्या काही प्रमुख चिंता जशा तांत्रिक आहेत तशाच त्या नोकरशाहीशी संबंधित आहेत. त्यांकडे त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे. स्वातंत्र्योत्तर भारतात पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी डिझाइन, ऑपरेशन, मानके, प्रक्रिया, मॅन्युअल, निकष आणि मार्गदर्शक तत्त्वे हे सारे केंद्रीय पातळीवरील संस्थांनी बनवलेले होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सुळे लवकरच केंद्रात मंत्री दिसतील!

## संजय शिरसाट यांचा मोठा दावा, ”भविष्यातील राजकारण वेगळ्या पद्धतीचे



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार) खासदार सुप्रिया सुळे लवकरच केंद्रात मंत्री होतील, असा दावा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री आणि शिवसेनेचे (शिंदे) प्रवक्ते संजय शिरसाट यांनी केला आहे. आज माध्यमांशी बोलत असताना त्यांनी विविध प्रश्नांवर आपली भूमिका मांडली. यावेळी त्यांना रोहित पवारांच्या एका विधानाबद्दलचे मत विचारण्यात आले होते. यावर बोलत असताना खासदार सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री म्हणून दिसतील, असे विधान संजय शिरसाट यांनी केले.

मानसन्मान मिळाला तर महाविकास आघाडीतून लढू अन्यथा स्वतंत्र उभे राहू, असे विधान रोहित पवार यांनी केले असल्याचा प्रश्न संजय शिरसाट यांना विचारण्यात आला होता. त्यावर उत्तर देताना शिरसाट म्हणाले, “मान-सन्मानाचा आता प्रश्न उरलेला नाही. रोहित पवारांना माहीत आहे की, आपल्याला आता मविआबरोबर राहायचे नाही. त्यांचे आजोबा दुसरा मार्ग पत्करत आहेत. काका अगोदरच दुसरीकडे गेलेले आहेत. सुप्रिया सुळे मोदींच्या नेतृत्वाखाली विदेशात जात आहेत. म्हणून मविआबरोबर राहणे त्यांना पचनी पडणारे नाही आणि ते राहणारही नाहीत.”भविष्यातील राजकारण वेगळ्या पद्धतीचे असेल असाही दावा संजय शिरसाट यांनी केला. भविष्यात शरद पवार हे दुसऱ्या पक्षात जाताना आपल्याला दिसतील, असेही ते म्हणाले. यावर पत्रकारांनी त्यांना विचारले की, भविष्यात सुप्रिया सुळे केंद्रामध्ये मंत्री म्हणून दिसतील का? यावर उत्तर देताना संजय शिरसाट म्हणाले की, नाकारता येत नाही. राजकारणात काहीही होऊ शकते. सुप्रिया सुळे यांची तशीही मंत्री होण्याची तीव्र इच्छा होती.शरद पवार महायुतीत कधीपर्यंत सामील होतील? याबद्दल विचारलेल्या प्रश्नावर संजय शिरसाट म्हणाले, “पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत मोठी उलाढाल होईल, अशी माहिती राजकीय वर्तुळातून मिळत आहे. पण ही माहिती खरी की खोटी? याची पुष्टी झालेली नाही.” पण लवकरच शुभमंगल सावधान होणार असल्याचे सूचक विधानही त्यांनी यावेळी केले.मानसन्मान मिळाला तर महाविकास आघाडीतून लढू अन्यथा स्वतंत्र उभे राहू, असे विधान रोहित पवार यांनी केले असल्याचा प्रश्न संजय शिरसाट यांना विचारण्यात आला होता. त्यावर उत्तर देताना शिरसाट म्हणाले, “मान-सन्मानाचा आता प्रश्न उरलेला नाही. रोहित पवारांना माहीत आहे की, आपल्याला आता मविआबरोबर राहायचे नाही. त्यांचे आजोबा दुसरा मार्ग पत्करत आहेत. काका अगोदरच दुसरीकडे गेलेले आहेत. सुप्रिया सुळे मोदींच्या नेतृत्वाखाली विदेशात जात आहेत. म्हणून मविआबरोबर राहणे त्यांना पचनी पडणारे नाही आणि ते राहणारही नाहीत.”भविष्यातील राजकारण वेगळ्या पद्धतीचे असेल असाही दावा संजय शिरसाट यांनी केला. भविष्यात शरद पवार हे दुसऱ्या पक्षात जाताना आपल्याला दिसतील, असेही ते म्हणाले. यावर पत्रकारांनी त्यांना विचारले की, भविष्यात सुप्रिया सुळे केंद्रामध्ये मंत्री म्हणून दिसतील का? यावर उत्तर देताना संजय शिरसाट म्हणाले की, नाकारता येत नाही. राजकारणात काहीही होऊ शकते. .शरद पवार महायुतीत कधीपर्यंत सामील होतील? याबद्दल विचारलेल्या प्रश्नावर संजय शिरसाट म्हणाले.

### 15 तारखेपर्यंत मोठी उलाढाल

“पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत मोठी उलाढाल होईल, अशी माहिती राजकीय वर्तुळातून मिळत आहे. पण ही माहिती खरी की खोटी? याची पुष्टी झालेली नाही.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार) खासदार सुप्रिया सुळे लवकरच केंद्रात मंत्री होतील, असा दावा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री आणि शिवसेनेचे (शिंदे) प्रवक्ते संजय शिरसाट यांनी केला आहे. यावर बोलत असताना खासदार सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री म्हणून दिसतील, असे विधान संजय शिरसाट यांनी केले.मानसन्मान मिळाला तर महाविकास आघाडीतून लढू अन्यथा स्वतंत्र उभे राहू, असे विधान रोहित पवार यांनी केले असल्याचा प्रश्न संजय शिरसाट यांना विचारण्यात आला होता. त्यावर उत्तर देताना शिरसाट म्हणाले.

# आंबोली घाट रस्त्यावर दरड कोसळली!

## वाहतूक कोंडी, बांधकाम विभागाने रस्ता केला पुर्ववत



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

बिगरमोसमी पावसाने सावंतवाडी तालुक्याला झोडपून काढले असून, सर्वत्र मुसळधार पाऊस कोसळत आहे. यामुळे आंबोली घाटात आज सकाळी दरड कोसळल्याने वाहतूक विस्कळीत झाली. वस मंदिरापासून सावंतवाडीच्या दिशेने काही अंतरावर ही घटना घडली. डोंगरावरून माती आणि दगड रस्त्यावर आल्याने दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.तातडीने वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

सार्वजनिक बांधकाम विभागाने (PUBLIC WORKS DEPARTMENT) तात्काळ घटनास्थळी धाव घेत दरड हटवण्याचे काम सुरू केले. युद्धपातळीवर काम करून वाहतूक पूर्ववत करण्यात आली आहे. वळीवाच्या पहिल्याच पावसात दरड कोसळल्याने वाहनधारक आणि स्थानिक नागरिक चिंतेत पडले आहेत. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाने पर्यटकांना आणि वाहनधारकांना काळजी न करण्याचे आवाहन केले आहे. दरड हटवण्याचे काम वेगाने सुरू असून, लवकरच रस्ता पूर्णपणे मोकळा होईल, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.दरम्यान, आंबोली घाट आता राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे आणि या विभागाने नुकतीच घाटाची डागडुजी केली आहे. असे असतानाही दरड कोसळल्याने आंबोलीतील नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, दरड कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत किंवा घडण्याची शक्यता आहे अशा धोकादायक ठिकाणी पुरेसा वेळ आणि लक्ष देऊन सर्वेक्षण करण्याची गरज आहे.आंबोली हे थंड हवेचे ठिकाण असून, ‘दक्षिण कोकणचे प्रति महाबळेश्वर’ म्हणून ओळखले जाते. पावसाळी पर्यटनासाठी महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक आणि इतर राज्यांतून हजारो पर्यटक येथे येतात.आंबोली येथील रहिवासी आणि पर्यटनप्रेमी काका भिसे यांनी आंबोली घाटाच्या देखभालीचे महत्त्व अधोरेखित केले. “घाटाच्या सुरक्षिततेसाठी खबरदारी घेणे महत्त्वाचे आहे.

### काळजी न करण्याचे आवाहन

यापूर्वी पर्यटन हंगामात घाटात दरड कोसळून आर्थिक नुकसान झाले होते, तसे पुन्हा होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे,” असे ते म्हणाले. पावसाळी पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत वाढ होत आहे. आंबोलीचा पाऊस, दाट धुके, धबधबे आणि निसर्गसौंदर्य अनुभवण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात, ज्यामुळे पावसाळी हंगामात व्यावसायिकांना आर्थिक फायदा होतो. त्यामुळे या घाटाची सुरक्षितता आणि देखभाल ही अत्यंत गरजेची असल्याचे भिसे यांनी सांगितले.सार्वजनिक बांधकाम विभागानेतात्काळ घटनास्थळी धाव घेत दरड हटवण्याचे काम सुरू केले. युद्धपातळीवर काम करून वाहतूक पूर्ववत करण्यात आली आहे. वळीवाच्या पहिल्याच पावसात दरड कोसळल्याने वाहनधारक आणि स्थानिक नागरिक चिंतेत पडले आहेत. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाने पर्यटकांना आणि वाहनधारकांना काळजी न करण्याचे आवाहन केले आहे.

# ...तर परिणाम भोगावे लागतील!

## सर्वात कुख्यात दहशतवादी पाकिस्तानातच : जयशंकर

**। नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी गुरुवारी दहशतवादी कारवायांमधील भूमिका सातत्याने नाकारणाऱ्या पाकिस्तानला चांगलेच फटकारले आहे. नेदरलँड्स दौऱ्यादरम्यान त्यांनी डच दैनिक डी वोल्क्सक्रांतला सांगितले की, "दहशतवादी कारवायांमध्ये पाकिस्तान आणि त्यांचे सैन्य सहभागी आहे."**



युरोपियन युनियनमधील भारताचा दुसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार असलेल्या नेदरलँड्सशी आर्थिक आणि धोरणात्मक संबंध मजबूत करण्याच्या उद्देशाने राजनैतिक दौऱ्यावर असताना, जयशंकर यांनी दहशतवादी कारवायांमधील पाकिस्तानच्या सहभागावर भारताची भूमिका स्पष्ट केली.एस. जयशंकर यांनी डिसेंबर २०२२ मध्ये पाकिस्तान "दहशतवादाचे केंद्र" असल्याचे म्हटले होते. याबद्दल विचारले असता, ते म्हणाले, "मी ते सुचवत नव्हतो, ते सांगत आहे. समजा ॲमस्टरडॅमच्या (नेदरलँड्सची राजधानी) मध्यभागी लष्करी केंद्रे असतील आणि तिथे हजारो लोक लष्करी प्रशिक्षणासाठी जमतात. तेव्हा तुमच्या सरकारला त्याबद्दल काहीच माहिती नाही असे तुम्ही म्हणाल का?" "पाकिस्तानला त्यांच्या देशात काय चालले आहे हे माहित नाही, असे आपण समजू नये. संयुक्त राष्ट्रांच्या यादीतील सर्वात कुख्यात दहशतवादी पाकिस्तानात आहेत. ते मोठ्या मोठ्या शहरांमध्ये दिवसाढवळ्या फिरतात. त्यांचे पत्ते माहीत आहेत, त्यांच्या कारवाया माहीत आहेत आणि त्यांच्यातील परस्पर संबंधही माहीत आहेत. म्हणून आपण दहशतवादी कारवायांमध्ये पाकिस्तानचा सहभाग नसल्याचे समजू नये. यामध्ये त्यांच्या सरकारसह सैन्याचाही हात आहे", असेही जयशंकर म्हणाले. परराष्ट्रमंत्र्यांनी पुढे सांगितले की, "पहलगाम हल्लाही त्यांनीच घडवून आणला आहे. त्यांनी स्वतःच्या अत्यंत मर्यादित आणि स्वार्थी हेतूंसाठी काश्मीरमधील गोष्टी नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी जाणूनबुजून या हल्ल्याला धार्मिक रंग दिला. त्यामुळे जगाने अशा गोष्टी स्वीकारू नयेत."जयशंकर यांनी यावेळी दहशतवाद आणि काश्मीर प्रश्न एकत्र करण्याचे प्रयत्न फेटाळून लावले. त्यांनी दहशतवादाला समर्थन करता येणार नाही असा "आंतरराष्ट्रीय गुन्हा" म्हटले. युरोपियन युनियनमधील भारताचा दुसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार असलेल्या नेदरलँड्सशी आर्थिक आणि धोरणात्मक संबंध मजबूत करण्याच्या उद्देशाने राजनैतिक दौऱ्यावर असताना, जयशंकर यांनी दहशतवादी कारवायांमधील पाकिस्तानच्या सहभागावर भारताची भूमिका स्पष्ट केली.एस. जयशंकर यांनी डिसेंबर २०२२ मध्ये पाकिस्तान "दहशतवादाचे केंद्र" असल्याचे म्हटले होते. याबद्दल विचारले असता, ते म्हणाले, "मी ते सुचवत नव्हतो, ते सांगत आहे. समजा ॲमस्टरडॅमच्या (नेदरलँड्सची राजधानी) मध्यभागी लष्करी केंद्रे असतील आणि तिथे हजारो लोक लष्करी प्रशिक्षणासाठी जमतात. तेव्हा तुमच्या सरकारला त्याबद्दल काहीच माहिती नाही असे तुम्ही म्हणाल का?" "पाकिस्तानला त्यांच्या देशात काय चालले आहे हे माहित नाही, असे आपण समजू नये. संयुक्त राष्ट्रांच्या यादीतील सर्वात कुख्यात दहशतवादी पाकिस्तानात आहेत. ते मोठ्या मोठ्या शहरांमध्ये दिवसाढवळ्या फिरतात. त्यांचे पत्ते माहीत आहेत, त्यांच्या कारवाया माहीत आहेत आणि त्यांच्यातील परस्पर संबंधही माहीत आहेत. म्हणून आपण दहशतवादी कारवायांमध्ये पाकिस्तानचा सहभाग नसल्याचे समजू नये. यामध्ये त्यांच्या सरकारसह सैन्याचाही हात आहे", असेही जयशंकर म्हणाले. परराष्ट्रमंत्र्यांनी पुढे सांगितले की, "पहलगाम हल्लाही त्यांनीच घडवून आणला आहे. त्यांनी स्वतःच्या अत्यंत मर्यादित आणि स्वार्थी हेतूंसाठी काश्मीरमधील गोष्टी नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी जाणूनबुजून या हल्ल्याला धार्मिक रंग दिला. त्यामुळे जगाने अशा गोष्टी स्वीकारू नयेत."जयशंकर यांनी यावेळी दहशतवाद आणि काश्मीर प्रश्न एकत्र करण्याचे प्रयत्न फेटाळून लावले. त्यांनी दहशतवादाला समर्थन करता येणार नाही असा "आंतरराष्ट्रीय गुन्हा" म्हटले.

### पाकिस्तानला चांगलेच फटकारले

पाकिस्तानला आग्रह करतील अशी अपेक्षा भारताने गुरुवारी व्यक्त केली आहे. भारत-तुर्किये संबंधांबद्दल विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले की, "एकमेकांच्या चिंतांबद्दल संवेदनशीलतेच्या आधारावर संबंध टिकतात." भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने सीमेलगतच्या भारतीय शहरांवर हल्ले करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता. हे हल्ले करण्यासाठी पाकिस्तानने तुर्कीयेचे ड्रोन आणि चीन-निर्मित क्षेपणास्त्रांचा वापर केला होता.परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी गुरुवारी दहशतवादी कारवायांमधील भूमिका सातत्याने नाकारणाऱ्या पाकिस्तानला चांगलेच फटकारले आहे.

# विमानाबाबत प्रश्न विचारताच ट्रम्प संतापले!

## कतारने एक आलिशान विमान अमेरिकेला भेट म्हणून दिल्यासंबंधी विचारला होता प्रश्न

**। नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी ओव्हल ऑफिसमध्ये दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष सिरिल रामाफोसा यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान ट्रम्प एका पत्रकारावर चांगलेच भडकल्याचे पाहायला मिळाले. या पत्रकाराने कतार सरकराने एक अत्यंत आलिशान विमान अमेरिकेला भेट म्हणून दिल्यासंबंधी प्रश्न विचारला होता. यावर संतापलेल्या ट्रम्प यांनी पत्रकाराला 'वाईट वार्ताहर' म्हणत त्याला बाहेर जाण्यास सांगितले. या संपूर्ण प्रकाराचा व्हिडीओ आता समोर आला आहे.**



कतार सरकारकडून ४०० दशलक्ष डॉलर किंमतचे बोईंग ७४७-८ जेट भेट म्हणून दिल्याबद्दल पत्रकाराने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला होता. कतारने दिलेले हे विमान एअर फओर्स वनच्या ऐवजी वापरले जाणार असल्याच्या चर्चा आहेत . मात्र यासंबंधी प्रश्न ऐकताच डोनाल्ड ट्रम्प पत्रकारावर चांगलेच संतापल्याचे पाहायला मिळाले. "तुम्ही त्याबद्दल का बोलत आहात? तुम्ही त्याबद्दल कशासाठी विचारत आहात? तुम्ही इथून चालते व्हा."डोनाल्ड ट्रम्प यांनी दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष रामफोसा यांना दक्षिण आफ्रिकेतील श्वेत वर्णाच्या शेतकऱ्यांविरोधातील गुन्ह्यांसंबंधी ५ मिनिटांचा व्हिडीओ दाखवल्यानंतर लगेच एनबीसी न्यूजचे वार्ताहर पिटर अलेक्झेंडर यांच्याकडून कतारच्या विमानाबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता. यावेळी ट्रम्प यांनी रिपोर्टर आणि एनबीसी न्यूज नेटवर्कवर श्वेत वर्णाच्या दक्षिण आफ्रिकेतील शेतकऱ्यांविरोधातील गुन्ह्यांचा वादग्रस्त विषय टाळल्याचा आरोप केला. ट्रम्प यांनी प्रश्न उपस्थित केला की, "याचा कतार जेटशी काय संबंध आहे? ते युनायटेड स्टेट्स एअर फोर्सला जेट देत आहेत. ठीक आहे?आणि ही चांगली गोष्ट आहे."ओव्हल कार्यालयात रामाफोसा यांच्याबरोबर झालेल्या चर्चेदरम्यान त्यांना एक पाच मिनिटांची व्हिडीओ क्लिप दाखवण्यात आली.

### पत्रकाराला बाहेर जाण्यास सांगितले

दक्षिण अफ्रिकन नागरिकांच्या सामूहिक कबरीचं ठिकाण दाखवण्यात आलं, ज्यांना त्यांच्या वंशाच्या आधारावर जमीन जप्त करताना ठार करण्यात आलं, असा दावा ट्रम्प यांनी केला. हा व्हिडीओ दाखवण्यात आल्यानंतर रामाफोसा यांनी ट्रम्प यांच्याकडे याबद्दल अधिक माहिती आणि या जागेचे लोकेशनची मागणी केली.यानंतर एनबीसी न्यूजचे रिपोर्टर अलेक्झांडर यांनी लगेचच कतार जेटचा प्रश्न विचारला. या प्रश्नावर संताप व्यक्त करत ट्रम्प म्हणाले की, "आपण इतर अनेक गोष्टींबद्दल बोलत आहोत. या पत्रकाराने कतार सरकराने एक अत्यंत आलिशान विमान अमेरिकेला भेट म्हणून दिल्यासंबंधी प्रश्न विचारला होता. यावर संतापलेल्या ट्रम्प यांनी पत्रकाराला 'वाईट वार्ताहर' म्हणत त्याला बाहेर जाण्यास सांगितले.

# वैष्णवी हगवणे मृत्यूप्रकरणी पुष्कर जोगची पोस्ट

पुण्यातील वैष्णवी हगवणे यांच्या मृत्यूप्रकरणी सध्या संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. १६ मे रोजी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते राजेंद्र हगवणे यांची सून वैष्णवीने आत्महत्या केली. मात्र, यामागचं कारण हुंड्यासाठीचा छळ व कौटुंबिक हिंसाचार असल्याचा आरोप वैष्णवीच्या पालकांनी केला आहे, वैष्णवीच्या मृत्यूमुळे राज्यभरात खळबळ उडाली आहे. राज्यभरातील राजकीय मंडळींसह कलाकारांनीही या घटनेबद्दल राग व्यक्त केला आहे. अभिनेता हेमंत ढोमेने एक्स पोस्ट शेअर करत दोषींना कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे. तसेच आता या प्रकरणावर अभिनेता पुष्कर जोगने देखील पोस्ट शेअर करत आपलं स्पष्ट मत मांडलं आहे.मराठी अभिनेता पुष्कर जोगने नुकतीच इन्स्टाग्राम स्टोरी शेअर करत वैष्णवी हगवणे प्रकरणावर संताप व्यक्त केला आहे. गुन्हेगारांना कठोर शिक्षा द्या अशी मागणी अभिनेत्याने त्याच्या पोस्टमध्ये केली आहे."खूप लाज वाटते... जे काही महाराष्ट्रामध्ये घडतंय... आधी स्वारगेट प्रकरण आता वैष्णवी... आपल्या भगिनी सुरक्षित आहेत का? एका मुलीचा बाप म्हणून भीती वाटते आता... पोस्ट टाकली की कोणीतरी ट्रोल करतंच.. पण, आता गप्प बसून चालणार नाही ना...माणुसकी आणि आपल्या समाजातील निरागस भगिनींचा प्रश्न आहे. गुन्हेगारांना कठोर शिक्षा द्या. JUSTICE FOR VAISHNAVI" असं पुष्कर जोगने त्याच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.दरम्यान, वैष्णवीच्या माहेरच्यांनी आरोप केला आहे की, सासरच्या मंडळींनी हुंड्यासाठी तिचा मानसिक आणि शारीरिक छळ केला.

# चिखलातील सीनसाठी गिरिजाने घेतली मेहनत



स्टार प्रवाह वाहिनीवर काही दिवसांपूर्वी सुरू झालेली 'कोण होतीस तू, काय झालीस तू' ही मालिका प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस पडत आहे. स्टार प्रवाहचीच जुनी लोकप्रिय जोडी म्हणजे अभिनेत्री गिरिजा प्रभू आणि अभिनेता मंदार जाधव या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. ही जोडी पुन्हा एकदा प्रेक्षकांचं मन जिंकण्यात यशस्वी होताना दिसत आहे. यामागचं कारण म्हणजे कलाकारांचा सशक्त अभिनय. कलाकारांचा अभिनय, मालिकेच्या कथानकातील ट्विस्ट यामुळेच मालिकेनं पहिल्याच आठवड्यात ६.७ हा टीआरपी मिळवला होता. याबद्दल प्रेक्षकांकडून कलाकारांचं कौतूक करण्यात आलं होतं. तसंच गिरिजा प्रभूने मालिकेत केलेल्या एका कठीण सीनमुळेही ती कौतुकास पात्र ठरली होती. गिरिजाने कमळाच्या दलदलीत जाऊन एका सीनचं शुटींग केलं होतं. या सीनचे अनेक क्षण सोशल मीडियावर व्हायरल झाले होते.या सीनसाठी गिरिजाने खूप मेहनत केली होती. या खास सीनच्या चित्रीकरणाचा अनुभव कसा होता? याबद्दल गिरिजाने प्रतिक्रिया दिली आहे. 'अल्ट्रा मराठी बझ'ला दिलेल्या मुलाखतीत गिरिजाने चिखलतील सीनच्या शुटींगच्या अनुभवाबद्दल म्हटलं, "आधी लाठीकाठी केली. त्यानंतर पाण्यात शुटींग केलं. यामुळे एक आत्मविश्वास आला. चिखलात उतरल्याच्या सीनबद्दल कळलं तेव्हा मी 'ठीक आहे' असं म्हटलं होतं. तेव्हा मी जास्त विचार केला नव्हता."शुटींगच्या दिवशी जेव्हा मी पाण्यात उतरले. तेव्हा सुरुवातीला खडी होती.

# ट्विंकल खन्नाची संतप्त पोस्ट

कोलकातामध्ये ट्रेनी डॉक्टरवर झालेल्या बलात्कार प्रकरणामुळे देशात सध्या संतापाचे वातावरण पाहायला मिळत आहे. बॉलीवूडमधील अनेक कलाकारांनी यावर संताप वक्त केला आहे. कंगना रणौत, आलिया भट्ट, विजय वर्मा, परिणीती चोप्रा, करीना कपूर खान या कलाकारांनी या घटनेवर व्यक्त होत संताप व्यक्त केला आहे. आता ट्विंकल खन्नानेदेखील सोशल मीडियावर संताप व्यक्त केला आहे. ट्विंकल खन्नाने इन्स्टाग्रामच्या अधिकृत अकाउंटवरून या घटनेवर भाष्य केले आहे. स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्टला तिने इन्स्टाग्राम पोस्ट करीत लिहिले की, मला ज्या लहानपणी गोष्टी शिकवल्या जात होत्या, त्याच गोष्टी मी माझ्या मुलीला शिकवत आहे. अभिनेत्री ट्विंकल खन्नाने आपल्या पोस्टमध्ये लिहिले, "या पृथ्वीवरील आणि देशातील ५० वर्षे आणि मी माझ्या मुलीला त्याच गोष्टी शिकवत आहे.

# आपण आक्षेप व्यक्त करतो पण



सोशल मीडिया आणि ट्रोलिंग हे समीकरण आता काही नवीन राहिलेलं नाही. सोशल मीडियावर नेटकऱ्यांकडून कलाकारांच्या अनेक चांगल्या गोष्टींचं कौतुक होतं. मात्र कौतुकापेक्षा अधिक आता ट्रोलिंगचं प्रमाणही वाढलं आहे. सोशल मीडियाद्वारे अनेक कलाकार त्यांचे फोटो, व्हिडीओ शेअर करत असतात. तसंच कामानिमित्तची माहिती देण्यासाठी ते या माध्यमाचा वापर करतात. पण अनेकदा या कलाकारांना ट्रोलिंग सहन करावं लागतं. सोशल मीडियावरील ट्रोलिंगकडे काही कलाकारांनी आता गप्प राहणंच पसंत केलं आहे. मराठी इंडस्ट्रीतील काही कलाकार या ट्रोलर्सकडे दुर्लक्ष करतात; पण काही असे कलाकार आहेत, जे या ट्रोलर्सना योग्य शब्दांत स्पष्टपणे सुनावतात. अशातच या ट्रोलर्सबद्दल मराठी अभिनेत्रीने प्रतिक्रिया दिली आहे. मराठी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी सोशल मीडियावरील ट्रोलिंगवर आणि या ट्रोलर्सवर तिची प्रतिक्रिया व्यक्त केली होती.'इसापनिती' या युट्यूब वाहिनीशी साधलेल्या संवादात सोनाली यांनी ट्रोलर्ससाठी एक सामुदायिक सभा घेऊन त्यांचं म्हणणं ऐकलं पाहिजे अशी प्रतिक्रिया दिली होती. तसंच या ट्रोलर्सच्या कमेंट्स फक्त नकारात्मकच का असतात? त्यांना सकारात्मक असं काही दिसत नाही का? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला होता.याबद्दल सोनाली म्हणालेल्या, "ट्रोलर्ससाठी एक नाही तर अनेक सामुदायिक सभा घेतली पाहिजे. तुम्ही या आणि व्यक्त व्हा की, तुम्हाला नक्की काय आवडत नाही. मी एके ठिकाणी बसून कलाकारावर कमेंट करणार की, काय कपडे घातले आहेत? हीच का आपली संस्कृती? मी हे लिहून मोकळी झाले.



# सोनमचा ड्रेस तुम्ही पाहिलात का?

मागील काही दिवसांपासून जगभरात कान्स फिल्म फेस्टिव्हलची चर्चा होत आहे. या फिल्म फेस्टिव्हलमध्ये भारतीय कलाकार, फॅशन डिझायनर व इन्फ्लुएन्सर्स आपल्या स्टायलिश लूकने लक्ष वेधून घेतात. यंदा ऐश्वर्या राय बच्चन, जॅकलिन फर्नांडिस, जान्हवी कपूर, नॅन्सी त्यागी, करण टॅकरसह अनेक कलाकारांनी कान्सच्या रेड कार्पेटवर जलवा दाखवला. या सर्वांमध्ये एका भारतीय तरुणीने दहशतवादी हल्ल्यांचा उल्लेख असलेला ड्रेस परिधान केला. दिल्लीतील करोल बाग येथील लोकप्रिय फॅशन व लाइफस्टाइल इन्फ्लुएन्सर सोनम छाब्राने तिच्या आउटफिट्च्या माध्यमातून दहशतवादी हल्ल्यात जीव गमावणाऱ्यांना श्रद्धांजली वाहिली. सोनम छाब्राचा पांढरा स्कर्ट आणि सिल्व्हर कॉर्सेट सेट फॅशन डिझायनर चारू भसीनने डिझाइन केला आहे. सिल्व्हर कॉर्सेटवर अनोखी डिझाईन आहे. पण डिझाइनचे वजन जास्त असल्याने ते पुढे वाकले आहे. त्याचबरोबर कोरीव काम करून त्याला एक आकर्षक लूक देण्यात आला आहे. तसेच, बॅकलेस डिझाइनमुळे हा ड्रेस आणखी ग्लॅमरस दिसतो.सोनमने लांब ट्रेल असलेला पांढरा स्कर्ट घातला आणि त्यावर मॅचिंग कॅप देखील स्टाइल केली आहे. ज्यावर गेल्या काही वर्षात झालेल्या दहशतवादी हल्ल्यांचा उल्लेख करण्यात आला आहे, त्याचबरोबर 'UNBROKEN' असा मेसेज देऊन शहीदांना श्रद्धांजली वाहण्यात आली आहे.

# अखेर लखनऊला सूर गवसला!

## गुजरातचा दारूण पराभव; रॉयल चॅलेंजर्ससाठी गुड न्यूज

**। नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्स आणि लखनऊ सुपर जायंट्स या दोन्ही संघांमध्ये हाय व्होल्टेज सामना पार पडला. लखनऊ सुपर जायंट्सने गुजरात टायटन्स संघासमोर विजयासाठी २३६ धावांचे आव्हान ठेवले होते. या धावांचा पाठलाग करताना गुजरातच्या फलंदाजांनी पूर्ण जोर लावला. पण लखनऊच्या गोलंदाजांनी गुजरातला २०२ धावांवर रोखलं. यासह लखनऊ सुपर जायंट्सने हा सामना ३३ धावांनी आपल्या नावावर केला. गुजरातच्या पराभवासह पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला गुणतालिकेत टॉप २ मध्ये जाण्याची सुवर्णसंधी आहे.**



गुजरात टायटन्स संघाला हा सामना जिंकण्यासाठी २३६ धावा करायच्या होत्या. हे आव्हान मुळीच सोपं नव्हतं. इतक्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना गुजरातला चांगल्या सुरुवातीची गरज होती. मात्र, या सामन्यात गुजरातच्या सलामी जोडीला हवी तशी सुरूवात करता आली नाही. साई सुदर्शन १६ चेंडूत २१ धावा करत माघारी परतला. तर कर्णधार शुबमन गिल २० चेंडूत ३५ धावा खर्च करत माघारी परतला.सलामी जोडी तंबूत परतल्यानंतर जोस बटलरवर संघाला विजय मिळवून देण्याची जबाबदारी होती. मात्र, तो देखील ३३ धावांवर माघारी परतला. शेवटी शेरफेन रुदरफोर्ड आणि शाहरुख खानने मोठे फटके मारले आणि संघाला विजयाच्या जवळ पोहोचवलं. पण शाहरूख खान ५७ तर रुदरफोर्ड ३८ धावांवर माघारी परतला.या सामन्यात गुजरात टायटन्सने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. लखनऊ सुपर जायंट्स संघाकडून डावाची सुरुवात करण्यासाठी एडन मार्करम आणि मिचेल मार्शची जोडी मैदानावर आली. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी ९१ धावा चोपल्या. एडन मार्करमने २४ चेंडूंचा सामना करत ३६ धावांची खेळी केली. तर मिचेल मार्शने ६४ चेंडूत ११७ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने १० चौकार आणि ८ षटकार खेचले. शेवटी निकोलस पूरन आणि ऋषभ पंतने मिळून गुजरातच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. निकोलस पूरनने २७ चेंडूत ४ चौकार आणि ५ षटकारांचा साहाय्याने ५६ धावांची खेळी केली. तर ऋषभ पंतने नाबाद १६ धावा केल्या. या खेळीच्या बळावर लखनऊने २ गडी बाद २३५ धावांचा डोंगर उभारला.लखनऊ सुपर जायंट्स संघातील फलंदाजांना शेवटच्या सामन्यांमध्ये सूर गवसला आहे. गुजरात टायटन्सविरुद्ध झालेल्या सामन्यात लखनऊच्या फलंदाजांनी चांगलाच हल्लाबोल केला. लखनऊकडून सलामीला आलेल्या मिचेल मार्शने गुजरातच्या गोलंदाजांची धुलाई करत आपलं शतक पूर्ण केलं. यासह त्याच्या नावे एका मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे. लखनऊ सुपर जायंट्स संघाकडून डावाची सुरूवात करण्यासाठी मिचेल मार्श आणि एडन मार्करमची जोडी मैदानावर आली. गुजरातच्या गोलंदाजांनी लखनऊच्या फलंदाजांना सुरूवातीला धावा करू दिल्या नाहीत. त्यामुळे लखनऊचे फलंदाज संघर्ष करताना दिसून आले.

### मिचेल मार्शचं शतक ठरलं विक्रमी

पावरप्लेचे शेवटचे षटक टाकण्यासाठी कागिसो रबाडा गोलंदाजीला आला. या षटकात लखनऊच्या फलंदाजांनी १५ धावा चोपल्या. इथून लखनऊच्या फलंदाजांनी संघाची धावसंख्या ५३ धावांवर पोहोचवली.मिचेल मार्शची तुफान फटकेबाजी सुरू असताना शुबमन गिलने चेंडू राशिद खानच्या हातात दिला. मात्र, राशिदला आपल्या अनुभवाचा फायदा घेता आला नाही. त्याने आपल्या पहिल्याच षटकात २५ धावा चोपल्या. या षटकात त्याने चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडला. शेवटचा एक चेंडू सोडला तर चेंडू सीमारेषेच्या पार गेले. या डावात फलंदाजी करताना त्याने ५६ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं. या खेळीदरम्यान त्याने १० चौकार आणि ६ षटकार खेचले.हे शतक मिचेल मार्शसाठी अतिशय खास ठरलं आहे. कारण याआधी आयपीएल २०२५ स्पर्धेत सहा फलंदाजांनी शतक झळकावली होती. हे सर्व भारतीय फलंदाज होते. मिचेल मार्श हा आयपीएल २०२५ स्पर्धेत शतक झळकावणारा सातवा फलंदाज ठरला आहे.

---

# इंग्लंडच्या बेन डकेटची स्फोटक खेळी!

## डकेटने अवघ्या अवघ्या 100 चेंडूत झळकावलं शतक

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**इंग्लंड आणि झिम्बाब्वे या दोन्ही संघांमध्ये ४ दिवसीय कसोटी सामन्याचा थरार सुरू आहे. दोन्ही संघ बऱ्याच वर्षांनी कसोटी सामना खेळण्यासाठी आमनेसामने आले आहेत. या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडच्या फलंदाजांनी तुफान सुरूवात केली आहे.**



संघातील सलामीवीर फलंदाज बेन डकेटने सलामीला फलंदाजी करताना झिम्बाब्वेच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. त्याने अवघ्या १०० चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं. हे त्याच्या कसोटी कारकिर्दीतील पाचवे शतक ठरले आहे. मात्र, हे शतक अतिशय खास ठरलं आहे. बेन डकेटने आतापर्यंत कसोटी क्रिकेटमध्ये ५ शतकं झळकावली आहेत. हे शतक त्याच्यासाठी अतिशय खास आहे. कारण त्याने पहिल्यांदाच मायदेशात खेळताना शतक झळकावलं आहे. तर दुसरं मुख्य कारण म्हणजे, त्याने दुसऱ्यांदा १०० किंवा त्यापेक्षा कमी चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं आहे. बेन डकेट इंग्लंडकडून असा कारनामा करणारा पहिलाच फलंदाज नाही. यापूर्वी जॉनी बेअरस्टो, जॅक क्रॉली आणि हॅरी ब्रुक यांनी देखील कसोटी क्रिकेटमध्ये असा कारनामा केला आहे.या सामन्याबद्दल बोलायचं झालं तर, या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. इंग्लंडकडून डावाची सुरूवात करण्यासाठी आलेल्या बेन डकेटने १३४ चेंडूत १४० धावांची खेळी केली. त्यानंतर तो झेबलाद होऊन माघारी परतला. आतापर्यंत जॅक क्रॉली ९० धावांवर नाबाद आहे. तर ओली पोपने ३९ धावा केल्या आहेत. इंग्लंडने ५० षटकांपर्यंत २८२ धावा केल्या आहेत.बेन डकेटच्या कसोटी कारकिर्दीबद्दल बोलायचं झालं तर, त्याने आतपर्यंत ३३ कसोटी सामन्यांमध्ये इंग्लंड संघाचं प्रतिनिधित्व केलं आहे. यादरम्यान त्याने ५ शतकं आणि १३ अर्धशतकं झळकावली आहेत. यादरम्यान त्याने ४० पेक्षाही अधिकच्या सरासरीने धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने २२७० धावा केल्या आहेत.तर वनडे कारकिर्दीबद्दल बोलायचं झालं तर, त्याने २२ सामन्यांमध्ये १०५८ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने ३ शतकं आणि ६ अर्धशतकं झळकावली आहेत.

### कारकिर्दीतील पाचवे शतक

संघातील सलामीवीर फलंदाज बेन डकेटने सलामीला फलंदाजी करताना झिम्बाब्वेच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. त्याने अवघ्या १०० चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं. कारकिर्दीतील पाचवे शतक ठरले आहे. मात्र, हे शतक अतिशय खास ठरलं आहे डकेटने आतापर्यंत कसोटी क्रिकेटमध्ये ५ शतकं झळकावली आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

। शुक्रवार ।
। दि. 23 मे 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## सर्व शासकीय कार्यालयांमध्ये स्पर्धा

# पीएमआरडीए आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांचा सत्कार

### मुख्यमंत्र्यांच्या 100 दिवस कृती कार्यक्रमात पीएमआरडीए तिसऱ्या स्थानावर

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्र्यांच्या 100 दिवस कृती कार्यक्रमाच्या मूल्यमापनात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने राज्यातील ९५ महामंडळे, प्राधिकरणे, शासकीय, निमशासकीय संस्थांमधून तिसऱ्या क्रमांकाचे स्थान मिळवले. याबद्दल महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांचा दिनेश ॲडव्हर्टायझिंग एजन्सीचे प्रोप्रायटर दिनेश लिंगावत, व वृक्ष प्राधिकरण सदस्य सुरेश वाडकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अर्थात पीएमआरडीए अंतर्गत वेबसाईट सुधारणा, कार्यालयीन सोईसुविधा,



स्वच्छता, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, गुंतवणुकीस चालना, तंत्रज्ञानाचा वापर अशा मुद्यांवर भर देण्यात आला आहे. याच मुद्द्यांच्या अनुषंगाने सर्व शासकीय कार्यालयांमध्ये स्पर्धा घेण्यात आली होती. या कार्यक्रमात शासनाच्या सर्व 95 महामंडळांनी सहभाग घेऊन अभूतपूर्व कामगिरी केली मात्र या 100 दिवसांच्या स्पर्धेतून निवडलेल्या राज्यातील सर्वोत्तम 5 महामंडळांची निवड झाली. ज्यामध्ये पीएमआरडीएला तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहेत.

## अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य धर्मनिष्ठा, कुशल प्रशासनाचे प्रतीक

### भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे : अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 व्या जयंती वर्षानिमित्त भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश यांच्यावतीने राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने भाजप पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) च्यावतीने अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे आणि त्यांच्या आदर्शातून प्रेरणा घेता यावी, यासाठी दि.२१ ते ३१ मे २०२५ या कालावधीत अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी दिली.**



अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त मोरवाडी येथील भाजप मध्यवर्ती कार्यालय येथे आज, बुधवार रोजी कार्यशाळा घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. तत्पूर्वी, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी आमदार अश्विनी जगताप, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, कार्यशाळेच्या वक्त्या कीर्तनकार शारदाताई मुंडे, संयोजक शितल शिंदे आदी मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. या निमित्ताने पक्षाच्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देत, पदाधिकाऱ्यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे म्हणाले "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची 300 वी जयंती ही केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण देशासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांचे कार्य हे समाजसेवा, धर्मनिष्ठा आणि कुशल प्रशासनाचे प्रतीक आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेले हे कार्यक्रम जनतेला त्यांच्या महान कार्याची आठवण करून देतील आणि युवा पिढीला प्रेरणा देतील. भाजपच्या वतीने आम्ही त्यांच्या आदर्शांना वंदन करतो आणि हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कटिबद्ध आहोत." माजी आमदार अश्विनी जगताप म्हणाल्या की; "अहिल्यादेवी होळकर या स्त्रीशक्तीचे ज्वलंत उदाहरण आहेत. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही समाजासाठी मोठे योगदान दिले. महिला सक्षमीकरणासाठी त्यांचे कार्य नेहमीच प्रेरणादायी राहील. त्यांच्या 300 व्या जयंतीनिमित्त महिलांसाठी आयोजित करण्यात आलेले विविध कार्यक्रम त्यांना आदरांजली वाहण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ देतील.

### कार्यशाळेला यांची प्रामुख्याने उपस्थिती

या कार्यशाळेला दक्षिण आघाडी प्रदेश अध्यक्ष राजेश पिल्ले, महोत्सवाचे संयोजक विजय उर्फ शीतल शिंदे, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, माउली थोरात, महेश कुलकर्णी, युवा मोर्चा अध्यक्ष राज तापकीर, धनराज बिरदा, सरचिटणीस अजय पाताडे, शैला मोळक, माजी नगरसेवक केशव घोळवे, सुरेश भोईर, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, मनोज ब्राह्मणकर, माधुरी कुलकर्णी, शर्मिला बाबर, अनुराधा गोरखे, योगिता नागरगोजे, बिभीषण चौधरी, गणेश ढोरे, हर्शल नढे, मोहन राऊत, अजित बुर्डे, शिवराज लांडगे, योगेश सोनावणे, मंगेश धाडगे, रामदास कुटे, धरम वाघमारे, संजय पटनी, समीर जावळकर, नंदकुमार भोगले, विजय शिनकर, दत्तात्रय ढगे, मधुकर बच्चे, मनीषा शिंदे, मनीषा पवार, प्रेरणा चंदाणी, जयश्री मकवाना, कोमल गौंडाडकर, दिपाली केंगारे, सीमा चव्हाण, सुरेश तावरे, सुर्यकांत गोफणे, पोपट हजारे, महादेव कवितके, देविदास साबळे, नामदेव पवार, गणेश ढाकणे, गोरक्षनाथ झोळ, खंडूदेव कठारे, प्रदीप बेंद्रे, सुर्यकांत खंडागळे, मनोजकुमार मारकड, नाईकनवरे, गोरख पाटील, संकेत चोंधे, नंदू कदम, सचिन राऊत, हनुमंत लांडगे, रुपाली वाघेरे, रत्नमाला देवमाने, रेणुका हेगडे, रोहन देशपांडे, संजय परळीकर, अतुल पवार, सज्जाद तांबोळी, सचिन सरक आदी पदाधिकारी – कार्यकर्ते उपस्थित राहून कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यशाळेचे प्रास्ताविक राजू दुर्गे यांनी केले. सूत्रसंचालन मोरेश्वर शेडगे यांनी तर आभार शैला मोळक यांनी मानले.


ADMISSION OPEN
Moraya Shikshan Sanstha
"यत् भावो – तत् भवति"
Computer 15 days Crash Course
Our Courses
> PowerPoint with animation
> Basic Excel
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> Basic Java
> Basic Tally
From
26th May 2025
1 Hour /day
Monday to Saturday
Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education

EDUCATING **MIND & HEART**

ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26

# Holistic Empowering Learning

IT ALL **STARTS HERE**



**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION

**55+** NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS

**11+** CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA

**17K+** 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES

**600+** TEACHING AND NON TEACHING STAFF

**13K+** 13,000 ALUMNI ACROSS GLOBE

**PRIYADARSHANI** GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA

+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org